**ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची माहिती विहित विवरणपत्रात (९६ कॉलममध्ये) भरणे व नियमितपणे अद्ययावत ठेवण्यासाठी कार्यपध्दती व संनियंत्रण निश्चित करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक :ग्रापाधो-१११२/प्र.क्र.१३५/पापु-७
दिनांक : ०६ ऑगस्ट, २०१२

**प्रस्तावना :**

केंद्र शासन व राज्य शासन पुरस्कृत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागात स्वतंत्र तसेच प्रादेशिक पाणी पुरवठा योजना मोठ्या प्रमाणावर घेण्यात आलेल्या आहेत. राज्यातील बहुतांश गावे / वाड्या / वस्त्यांमध्ये पाणी पुरवठ्याच्या विविध योजना अस्तित्वात असूनही, स्त्रोत कमी पडणे, आटणे, योजना मोडकळीस येणे, पाणी पुरवठा कमी होणे, लोकसंख्या वाढ इ. कारणांमुळे संबंधित गाव / वाड्या / वस्त्यांसाठी नविन / वाढीव पाणी पुरवठा योजना घेण्यात येतात.

२. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत वार्षिक कृती आराखड्यानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. प्रत्येक गाव /वाडी / वस्तीमध्ये अस्तित्वात असलेली पाणी पुरवठा व्यवस्था लक्षात घेऊन तेथे वाढीव/नविन पाणी पुरवठा योजना प्रस्तावित करणे अपेक्षित असते. यासाठी, गावातील उपलब्ध पाणी पुरवठ्याची व्यवस्था त्यातील तांत्रिक,आर्थिक व व्यवस्थापकीय माहिती विहित विवरणपत्रात (९६ + कॉलममध्ये) तयार करण्याबाबतच्या सूचना सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अभियंत्यांना देण्यात आलेल्या होत्या.

३. राज्य शासनाच्या ई-गव्हर्नन्स धोरणानुसार, विविध कार्यक्रम व योजनांची माहिती ही माहिती व्यवस्थापन प्रणालीवर (MIS) उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने, सदर माहिती विहित विवरण पत्रामध्ये नियमितपणे अद्ययावत करुन कृती आराखड्यामध्ये घ्यावयाच्या गावाची निवड, या विवरण पत्रातील माहितीच्या आधारे करणे तसेच, ही माहिती गावाच्या प्रस्तावांसह जोडण्याबाबतसुध्दा निर्देशित करण्यात आलेले होते. परंतु याप्रमाणे कार्यवाही संबंधितांकडून होत नसल्याने संबंधित ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा मान्यता विषयक निर्णय राज्य स्तरावर घेताना किंवा धोरण ठरविताना विलंब होतो. या बाबींचा विचार करुन ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अद्ययावत माहिती विहित विवरण पत्रामध्ये नियमितपणे तयार ठेवण्याची व त्याचा विनियोग कृती आराखड्यामध्ये गावांचा समावेश करण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

जिल्ह्यातील सर्व गावे / वाड्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा विषयक उपाय योजनांची माहिती, विविध उपांगांसह, (९६+ कॉलम) विहित विवरणपत्रात भरणे आणि नियमितपणे अद्ययावत करणे बंधनकारक राहील.

२. याबाबतची जबाबदारी सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील योजनांच्या बाबतीत संबंधित कार्यकारी अभियंता यांची राहील. तर सदर माहितीच्या अद्ययावतीकरणाचे संनियंत्रण संबंधित अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे राहील.

३. अद्ययावत विहित विवरणपत्रातील माहितीच्या आधारेच राष्ट्रीय ग्रामीण पेय जल कार्यक्रमांतर्गत गावांचा कृती आराखड्यामध्ये समावेश करण्यात यावा. या अद्ययावत विवरणपत्रामध्ये न हाताळलेली, टंचाई परिस्थिती

असलेली, स्त्रोत अपूरा असलेली, स्लिप्ड बक इत्यादी गावे ठळकपणे दर्शविण्यात यावीत व या आधारे कृती आराखड्यात गावांचा समावेश करण्यात यावा.

४. ग्रामीण पाणी पुरवठा स्वतंत्र व प्रादेशिक योजनांसदर्भात राज्यस्तरावर आयोजित विविध बैठका, प्रशासकीय मान्यता, सुधारित प्रशासकीय मान्यता, दरडोई खर्चास मान्यता इत्यादीसाठी संबंधित गावातील योजनांची अद्ययावत विवरणपत्रे सोबत ठेवणे बंधनकारक राहील.

५. या माहितीचे अद्ययावतीकरण दर तीन महिन्यांनी सर्वसाधारणपणे, जानेवारी, एप्रिल, जुलै व आक्टोबर या महिन्यांच्या पहिल्या आठवड्यात करणे बंधनकारक राहील. संबंधित अधिक्षक अभियंता, यांनी प्रमाणित त्रैमासिक अहवाल सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांना सादर करावा.

६. उपरोक्त माहिती विहित विवरणपत्रात न भरणे, किंवा नियमितपणे अद्ययावत न केल्यास, संबंधित कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद / महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तसेच तसेच संबंधित अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहतील.

७. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०८०६१३५५३११८०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( र. अं. खडसे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
२. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
३. मा.विधी मंडळ सदस्य (सर्व)
४. प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक
५. राज्य माहिती आयुक्त,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
७. विभागीय आयुक्त (सर्व)
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय,मुंबई
९. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११. निबंधक, उच्च न्यायालय (अपील व मुळ शाखा), मुंबई
१२. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (WSSO) बेलापूर, नवी मुंबई
१३. महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१४. महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१५. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
१६. उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
१७. सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
१८. सर्व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१९. सर्व अधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
२०. सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
२१. सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
२२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
२३. सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
२४. मंत्रालयातील सर्व विभाग,
२५. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
२६. निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७